## माहे एप्रिल २०२२ महाचा मासिक अहवाल

## मासिक अहवालामध्ये खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.

| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद ग्रामीण | खुशी (डॉबरमन) | पो.हवा./ ८९५ व्ही .एस. तळेकर | पोलीस स्टेशन कन्नड (शहर) गु.र.नं. ७६/२०२२ भा.दं.वि. कलम ३९५, ३९७ हा गुन्हा दिनांक १३/०४/२०२२ रोजी दाखल असुन सदर गुन्हयातील घटनास्थळावर संशयित इसमाचे सॅण्डलचे जोड मिळून आले होते. कन्नड (शहर) येथे तपासी अंमलदार यांनी संशयित आरोपीस ५ ते ६ इसमांमध्ये उभे करून सॅण्डलचा वास श्वान खुशी हीस देवुन ओळखपरेड घेतली असता श्वान खुशीने इसम नामे बाळू सुभाष वाघ, वय ३२ वर्षे, रा. पडेगाव यास ओळखुन भुंकून इशारा दिला. सदर आरोपीकडे अधिक तपास केला असता कन्नड ग्रामीण पो.स्टे. गु. र. नं. ५१/२०२२ भा. दं. वि. ३९५, ३९७, ४५८ हा देखील गुन्हा केल्याची कबुली दिली. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| २ | औरंगाबाद ग्रामीण | खुशी (डॉबरमन) | पो.हवा./ ८९५<br>व्ही .एस. तळेकर | पोलीस स्टेशन कन्नड (ग्रामीण) गु.र.नं. ६५/२०२२ भा.दं.वि. कलम ३०२ हा गुन्हा दिनांक १३/०४/२०२२ रोजी दाखल असून मयताचे शर्टचा वास श्वान खुशी हीस देवुन सोडले असता ती घटनास्थळी मक्याचे शेतात फिरून सरी-सरीने पश्चिम बाजूस जावुन एका घराजवळ गेली. सदर घर मालकाने त्याचे नाव मेहबुब खॉ रसुल खॉ पठाण असल्याचे सांगितले. सदर घराचे कुलूप उघडले असता श्वान खुशी घरात सर्वत्र फिरून पाय-याने गच्चीवर जावुन घुटमळून थांबली. तपासी अंमलदार यांनी सदर इसमास ताब्यात घेवुन सदर गुन्हयाचा अधिक तपास केला असता गुन्हा उघडकीस आला. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ३ | भंडारा | नॉटी | १) पोहवा/७२१ टिकाराम कोरे<br>२) पोहवा/१७७ प्रल्हाद ढोरे | वनपरिक्षेत्र नाकाडोंगरी अंतर्गत आंधळगाव पो.स्टे. ४/२०२२ वन्यजीव संरक्षण अधि. १९७२ हा गुन्हा दि.३१/३/२०२२ रोजी दाखल असून सदर गुन्हयामध्ये घटनास्थळावरील पाउलखुणांचा वास श्वान नॉटी यास दिला असता श्वान नॉटी संपुर्ण शेताच्या बांधावर फिरून शेतात असलेल्या मोहाच्या झाडाजवळ येवुन भुंकू लागला सदर मोहाच्या झाडामध्ये तुळशीराम दशरथ लिल्हारे व त्यांची पत्नी हे फुल वेचण्याचे काम करत होते. सदर इसमास इतर ३ इसमांसोबत ५ फुटाचे अंतर ठेवुन ओळखपरेड घेतली असता श्वान नॉटी याने तुळशीराम दशरथ लिल्हारे, वय ६५ वर्षे, रा.बपेरा यांचे अंगावर भुंकून इशारा दिला सदर इसमाकडे तपास केला असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ४ | गोंदीया | लुसी | १) पोहवा/३९३ विजय बी. ठाकरे | रेल्वे प्रोटेक्शन फोर्स गु.र.नं. ३२/२०२२ एनडीपीएस ॲक्ट ८ (क) २० (ब) हा गुन्हा १५/४/२०२२ रोजी दाखल असून रेल्वे स्टेशन परिसरामध्ये जीआरएफ टीमचे मदतीने शोध घेत असताना प्लॅटफॉर्म नं ३ जवळ १५ संशयीत प्लॅस्टीकचे बंडल मिळून आल्याने श्वान लुसी हीस गो स्मेल फाईंड असा आदेश दिला असता ती सदर प्लॅस्टीक बंडलचा वास घेवुन बसून व भुंकून इशारा दिला सदर प्लॅस्टीक बंडल मधुन ३१.२७२ किलो गांजा जप्त करण्यात आला. |




अशा प्रकारे माहे एप्रिल २०२२ मध्ये खून - १, दरोडा - १, वन्यजीव अधिनियम - १, एनडीपीएस - १ असे एकुण ४ गुन्हे श्वान पथकामार्फत उघडकीस आलेले आहेत.